# तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी चिपळूण यांचे कार्यालय

## ता. चिपळूण जि. रत्नागिरी . पीन कोड ४१५६०५

दुरध्वनी नं :- ०२३५५-२५२०४४ Email :-tah_chiplun@rediffmail.com

क्र .आरटीएस /२४x७/तक्रार निवारण/८/२०१९ दिनांक ६/०८/२०१९

प्रति,

श्री.अनिल काशिराम कदम
रा. खेर्डी , ता. चिपळूण ,जि. रत्नागिरी

विषय:- रत्नागिरी २४x७ वरील आपण केलेल्या तक्रारी बाबत तक्रार क्र . ११/०७/२०१९ बाबत

महाशय ,

आपण रत्नागिरी २४*७ वर दिनांक १०/०७/२०१९ रोजी मौजे खर्डी येथिल जमिन मिळकतीला आपले नाव लावणे बाबत (वारस तपास ) होत नसलेबाबत तक्ररी अर्ज केला आहे. याच अनुषंगाने आपण या पुर्वि ही रत्नागिरी २४*७ वर दिनांक २/०४/२०१९ रोज तक्रारी अर्ज केला होता त्या प्रमाणे आपल्या तक्रारीचे निवारण करण्यात आले होते.

आम्ही आपणास कळवू इच्छितोकी कै. तानू धोडु कदम यांच्या मृत्यु पाश्चात तलाठी अभिलेखात ववारस तपासासाठी (एकाच नावाच्या ) व्यक्तीच्या वारस तपाससाठी दोन (२) अर्ज प्राप्त झाले आणि दोन्ही अर्जात मिळकती एकच असून वारसांच्या नावात विसंगती दिसुन आली.

आपण केलेल्या दिनांक २/०४/२०१९ च्या तक्रारीच्या अनुषंगाने अभिलेख प्रत्येक्ष स्थानिक चौकशी व बाळाराम कदम यांनी वारस तपासासाठी केलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता श्री. तानु धोंडू कदम यांना दोन पत्नी होत्या व आपणास सावत्र भावंडे आहेत ही बाब आपण वारस तपासासाठी दिलेल्या अर्जा सोबत जोडलेल्या प्रतीज्ञापत्रा मध्ये उल्लेख नकरता कै. तानू धोडु कदम यांच्या आपण स्वत: व आपली सख्खी भावंडे यांच्या व्यतीरीक्त असलेले इतर वारसदार यांची नावे जाणीव पुर्वक लपवून ठेवली आहे असे सिद्ध होते सदर बाब ही दंडनिय आहे.

श्री. तानु धोडु कदम यांच्या वारस तपासासाठी तलाठी यांचेकडे दोन वेगवेगळे अर्ज प्राप्त झाले दोन्ही अर्जात विसंगती असून श्री बाळाराम कदम यांनी केलेल्या वारस तपास अर्जावरून अभिलेखात फेरफार नं १०३९८ अन्वये फेरफार नोंद करण्यात आली त्याच दरम्याने आपलाही अर्ज तलाठी यांचेकडे प्राप्त झाला . एकाच व्यक्तीच्या वारस तपासाच्या अर्जामध्ये मिळकती सारख्या असून वारसांच्या नावामध्ये विसंगती दिसून आली. असे असूनही तलाठी यांनी फेरफार नं १०३९८ बाबत नोटिस बजावणी केली परंतु सदर नोटिसी प्रमाणे अर्जदार श्री. बाळाराम कदम यांच्या व्यतीरीक्त कोणीही हजर राहीले नाही . हजर राहीलेल्या अर्जदार यांनी इतर वारासांना नोटिस बजावणी पुर्ण करण्यासाठी कायम वास्तव्याचे पत्ते उपलब्ध करून दिले नाहीत. दोन्ही अर्जातील विसंगती व वारासांना नोटिस बजावणी पुर्ण करण्यासाठी कायम वास्तव्याचे पत्ते उपलब्ध होत नसल्याने मंडळ अधिकारी यांनी सदरची नोंद रद्द करून फेर नोंद घालावी असा शेरा ठेवून रद्द केली आहे. तरी आपण आपले वडिल कै. तानु धोंडु कदम यांच्या वारस तपासासाठी विहीत नमुन्यातील अर्ज सर्व कायदेशिर वारसाबाबतचे प्रतिज्ञापत्र व सर्व वारसांचे सध्या रहीवासाचे पत्ते नमुद करून तलाठी यांचेकडे फेर अर्ज सादर करावा . आपले अर्जा प्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्यात येईल.

आपला विश्वासू

तहसिलदार चिपळूण

प्रत,

मा. जिल्हाधिकारी सो. रत्नागिरी यांचकडे माहीतीसाठी सविनय सादर.

Scanned by CamScanner